जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२३/०५/२०२३
## दि.२२/०५/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २०४/२०२३,भादविक १४१,१४३,१४७,१४९,३३६,४२७,महा.पो.का.क.३७(१)(३) सह १३५ |
| **फिर्यादी** | अक्षय सातपुते, वय ३० वर्षे, रा.कॅनॉल रोड, कर्वेनगर, पुणे. |
| **आरोपीत** | तीन दुचाकी गाडीवरील पाच ते सहा अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/०५/२०२३ रोजी रात्रौ ०३/०० वा.चे सुमारास गल्ली नं.७, कॅनॉल रोड,कर्वेनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांची चारचाकी गाडी सदर ठिकाणी पार्क करुन लघुशंकेला गेले असताना,नमुद इसमांनी फिर्यादी यांचे गाडीच्या पाठीमागील बाजुची काच दगडाने मारुन फोडुन,त्यांचे शेजारी पार्क केलेली चारचाकी गाडीची समोरील काच फोडुन,बँकेचे एमटीएम असलेले दरवाजेची काच फोडुन,सणस डेअरीचा बोर्ड फोडुन नुकसान करुन,साक्षीदार महिला यांचे टेम्पोवर दगड मारुन काच फोडुन त्यांचे जीवितास धोका निर्माण होईल अशा रितीने हयगयीने निष्काळजीपणाने घराच्या खिडकीची काच फोडुन नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मनोज बागल, ८३०८३९९१२२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे २५०/२०२३,भादविक १४३,१४७,१४८,३२६,३५४,३२४,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ३० वर्षे,रा.लोहगाव,पुणे |
| **आरोपीत** | एकुण सहा महिला व एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०५/२०२३ रोजी रात्रौ २०/३० वा.लेन नं.३,गुरुव्दार कॉलनी,ओव्हाळ वस्ती,लोहगाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया कामावरुन घरी येत असताना,नमुद इसमांनी गैर-कायदयाची मंडळी जमवुन,सकाळी झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन फिर्यादीस शिवीगाळ करुन,त्यांना धमकी देवुन,लोखंडी हत्याराने फिर्यादीचे डोक्यात मारुन जखमी करुन,फिर्यादी हया घरात जात असताना,त्यांचे जवळ जावुन,त्यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मोहन साळवी ९३७१०२०५१४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ५२२/२०२३,भादविक २७९,३०४(अ)३३७,३३८,४२७,मोव्हेॲक्ट १८४,१३४(अ)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | मतीन शेख,वय २८ वर्षे,रा.मोदीखान,कॅम्प,पुणे |
| **आरोपीत** | मैनुद्दीन मेहबूब शेख,वय ४२ वर्षे,रा.१५९,ए.डी.कॅम्प,पुणे (अटक ) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०५/२०२३ रोजी १९/०५ वा. एन.आय.बी.एम रोड,ऑर्चिड पॅलेस सोसायटी समोर,उंड्री,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रासह कारमधुन जात असताना,नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात उताराला त्याचे वाहनांचा वेग कमी न करता ते चालवुन,फिर्यादी यांचे कारला समोरुन धडक देवुन,एक रिक्षा,तीन दुचाकी,सहा चारचाकी |

वाहनांना समोरुन धडक देवुन,सदर वाहनांचे नुकसान करुन,मोपेड गाडीवरील प्रशांत भानुदास घेमुड,वय-३७,रा.कोंढवा,पुणे यांचे दुचाकीला समोरुन धडक देवुन,त्यांस गंभीर जखमी करुन,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन तीनचाकी टेम्पोवरील चालक इजराईल इस्माईल सैय्यद,वय २४ वर्षे,रा.सय्यदनगर,पुणे व मधु कवार,वय ४२ वर्षे,रा.लाईफ पार्क बी२/११०१,उंड्री,पुणे यांना गंभीर जखमी करण्यास कारणीभुत झाला आहे.

**त.अंमलदार** पोलीस अंमलदार, रासकर ८६८९९४५९९९

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** विश्रामबाग पो स्टे १०३ /२०२३,भादविक ३८१

**फिर्यादी** ज्येष्ठ नागरीक,वय ७० वर्षे,रा.लॉ कॉलेज रोड,पुणे

**आरोपीत** बसाप्पा वाल्मिक शिंगरे,वय ३६ वर्षे,रा.सोलापुर (अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक २२/०५/२०२३ रोजी १३/१५ वा. पेपर गल्ली,शनिवार पेठ,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांनी त्यांचेकडील वाहन चालक कामगार यातील नमुद इसम यास पेपर गल्ली,शनिवार पेठ,पुणे येथे पैसे घेवुन येण्यासाठी फिर्यादी यांचे ओळखीचे इसमाकडे पाठविले असताना,सदर इसमाने त्यांचेकडुन एकुण २२,६५,०००/- रुपये घेवुन,सदरची रक्कम फिर्यादी यांना न देता,सदरची रक्कम चोरी करुन पळुन गेला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. राकेश सरडे ९९२३४०६४७६

## दि.२३/०५/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

**पो.स्टे.गुरनं./कलम** उत्तमनगर पो स्टे ५९/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,५०६,१४३,१४५,१४७,१४८,महा.पो.का.क.३७(१) सह १३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क. ७

**फिर्यादी** आकाश किंडरे,वय २६ वर्षे,रा.उत्तमनगर,पुणे

**आरोपीत** १.श्री गणेश वाघमारे,वय-२२,रा.राहुलनगर,शिवणे,उत्तमनगर,पुणे २.प्रतिक संजय नलवडे,वय-२४,रा.गंगा बिल्डींग,कोंढवे-धावडे,पुणे (अटक) व इतर तीन इसम

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२२/०५/२०२३ रोजी २०/५० वा.विठ्ठल मंदिरा समोरील झ-या जवळील रस्त्यावर,उत्तमनगर, पुणे येथे

**तपशिल** यातील नमुद इसमांची फिर्यादी यांचेबरोबर चार दिवसापुर्वी झालेल्या भांडणाचे कारणावरुन,सदर इसमांनी त्यांचे हातात धारधार हत्यारे घेवुन येवुन,फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने धारधार हत्याराने मारून,तेथील नागरीकांना बांबुने मारुन चिकनच्या व हेअर कटींगच्या दुकानावर दगड फेकुन मारुन,त्यांचे दुकानाचे नुकसान केले.

**त.अंमलदार** सहा.पोलीस निरीक्षक, दादाराजे पवार ७०२१६३६७४९

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** सहकारनगर पो स्टे १२६/२०२३,भादविक ३२४,४५२,३२३,५०४,५०६,३४,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)१३५

**फिर्यादी** एक महिला,वय ३८ वर्षे,,रा.चव्हाणनगर,धनकवडी,पुणे

**आरोपीत** दोन इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२२/०५/२०२३ रोजी १४/३० वा.शंकर महाराज वसाहत,धनकवडी,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हया त्यांचे पती आणि फिर्यादी यांचा भाऊ हेमाराम हे त्यांचे टेलरींगचे दुकानावरती हजर असताना,यातील नमुद इसमांनी संगनमत करून,सदर ठिकाणी येवुन जुन्या भांडणाचा राग मनात धरून, आम्हाला म्हणु लागले कि,तुम्ही आमचे शेजारी टेलरींगचे काम का चालु केले आहे. तुम्हाला माज आला आहे का असे म्हणुन शिवीगाळ करू लागले. त्यावेळी फिर्यादी यांचे पती तुम्ही का शिवीगाळ करीत आहात असे म्हणुन ते दुकाना बाहेर आले असता,सदर इसमांनी लाकडी बॅटने पती यांचे डोक्यात मारली. त्यावेळी हेमाराम हा भांडणे सोडवण्यासाठी गेला असता,त्यालाही लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. फिर्यादी यांचे पती हे पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यासाठी जात असताना,त्यांनी दुकाना मध्ये शिरून बॅटने फिर्यादी यांचे डोक्यात मारली. तुम्ही येथे धंदा कसा करता,ते बघतो असे म्हणुन जीवे मारण्याची धमकी देवुन निघुन गेले आहेत.

**त.अंमलदार** पोलीस अंमलदार, एस.के.जोशी ९७६६८४५४२८

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**